का. प्र.

भारत सरकार
विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

( १९७० चा अधिनियम क्रमांक ३७.)

(१ नोव्हेंबर १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे)

# The Contract Labour (Regulation And Abolition) Act, 1970

( Act No. 37 of 1970 )

( As in force on 1st November, 1977)

संचालक, मुद्रण व लेखन सामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
(१९७८)

किंमत ५० पैसे

# कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

**कलमांचा क्रम**

कलमे

## प्रकरण १ ले

**प्रारंभिक**


१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ आणि प्रयुक्ती.
२. व्याख्या.


## प्रकरण २ रे

**सल्लागार मंडळे**


३. केंद्रीय सल्लागार मंडळ.
४. राज्य सल्लागार मंडळ.
५. समित्या घटित करण्याची शक्ती.


## प्रकरण ३ रे

**कंत्राटी कामगारांना कामाला लावणाऱ्या आस्थापनांची नोंदणी**


६. नोंदणी अधिकाऱ्यांची नियुक्ती.
७. विवक्षित आस्थापनांची नोंदणी.
८. विवक्षित प्रकरणी नोंदणी प्रत्याहृत करणे.
९. नोंदणी न केल्याचा परिणाम.
१०. कंत्राटी कामगारांना कामाला लावण्यास मनाई.


## प्रकरण ४ थे

**कंत्राटदारांना लायसने देणे**


११. लायसन अधिकाऱ्यांची नियुक्ती.
१२. कंत्राटदारांना लायसने देणे.
१३. लायसने मंजूर करणे.
१४. लायसनांचे प्रत्याहरण, निलंबन व विशोधन.
१५. अपील.


## प्रकरण ५ वे

**कंत्राटी कामगारांचे कल्याण व आरोग्य**


१६. आहारगृहे.
१७. विश्रांतिकक्ष.
१८. अन्य सुविधा.
१९. प्रथमोपचाराच्या सुविधा.
२०. विवक्षित बाबतीत मुख्य नियोक्त्याचे दायित्व.
२१. वेतन देण्याची जबाबदारी.

## प्रकरण ६ वे

**दंड आणि प्रक्रिया**

**कलमे**

२२. अटकाव.

२३. कंत्राटी कामगारांना कामाला लावण्यासंबंधीच्या उपबंधांचे व्यतिक्रमण.

२४. अन्य गुन्हे.

२५. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

२६. गुन्ह्यांची दखल घेणे.

२७. अभियोगांची मुदत.

## प्रकरण ७ वे

**संकीर्ण**

२८. निरीक्षण कार्य करणारा कर्मचारीवर्ग.

२९. नोंदवह्या आणि अन्य अभिलेख ठेवावयाचे.

३०. या अधिनियमाशी विसंगत असलेल्या कायद्यांची व करारांची परिणामकता.

३१. विशेष प्रकरणात सूट देण्याची शक्ती.

३२. या अधिनियमाखाली केलेल्या कारवाईस संरक्षण.

३३. निदेश देण्याची शक्ती.

३४. अडचणी निवारण करण्याची शक्ती.

३५. नियम करण्याची शक्ती.

# कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०

## (१९७० चा अधिनियम क्रमांक ३७)

[५ सप्टेंबर, १९७०]

विवक्षित आस्थापनांमधील कंत्राटी कामगारांचे सेवायोजन विनियमित करण्यासाठी आणि विवक्षित परिस्थितीत त्याचे उच्चाटन करण्याचा व तत्संबंधित बाबींचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण १ ले

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'कंत्राटी कामगारसेवा (विनियमन व उच्चाटन) अधिनियम, १९७०' असे म्हणता येईल. **संक्षिप्त नाव, विस्तार, प्रारंभ आणि प्रयुक्ती.**

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेव्दारे नियत करील अशा दिनांकास[१] तो अंमलात येईल व या अधिनियमाच्या निरनिराळ्या उपबंधांसाठी निरनिराळे दिनांक नियत करता येतील.

(४) तो—

(क) ज्या आस्थापनेमध्ये वीस किंवा त्याहून अधिक कामगार कंत्राटी कामगार म्हणून कामाला असतील किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला होते अशा प्रत्येक आस्थापनेला ;

(ख) जो कंत्राटदार वीस किंवा अधिक कामगार कामाला ठेवतो किंवा ज्याने मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामाला ठेवले होते अशा प्रत्येक कंत्राटदाराला लागू होतो :

परंतु वीसपेक्षा कमी कामगार कामाला ठेवणाऱ्या कोणत्याही आस्थापनेला किंवा कंत्राटदाराला या अधिनियमाचे उपबंध लागू करण्याचा आपला उद्देश असल्याबाबत किमान दोन महिन्यांची नोटीस दिल्यानंतर समुचित शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ते उपबंध अधिसूचनेमध्ये ती कामगारसंख्या विनिर्दिष्ट करून त्याप्रमाणे लागू करता येतील.

(५) (क) ज्या आस्थापनांमध्ये अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे अशाच स्वरूपाचे काम केले जाते त्यांना तो लागू होणार नाही.

(ख) एखाद्या आस्थापनेमध्ये केले जाणारे काम हे अधूनमधून किंवा निमित्तवशात् करावे लागणारे अशा स्वरूपाचे आहे किंवा काय असा जर प्रश्न उद्भवला तर, समुचित शासन केंद्रीय मंडळाशी किंवा, प्रकरणपरत्वे, राज्य मंडळाशी विचारविनिमय करून नंतर त्या प्रश्नाचा निर्णय करील व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण :**—या पोटकलमाच्या प्रयोजनार्थ, एखाद्या आस्थापनेमध्ये केले जाणारे काम हे,—

(एक) जर मागील बारा महिन्यांत एकशेवीस दिवसांपेक्षा अधिक दिवस केलेले असेल, किंवा

(दोन) जर हंगामी स्वरूपाचे असून एका वर्षामध्ये साठ दिवसांपेक्षा अधिक दिवस केलेले असेल,

तर ते अधूनमधून करावे लागणारे अशा स्वरूपाचे काम मानण्यात येणार नाही.

२. (१) या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "समुचित शासन" याला—

(१) (एक) केंद्र शासनाच्या प्राधिकाराअन्वये किंवा त्याखाली चालवलेल्या कोणत्याही उद्योगाशी संबंधित असणारी किंवा केंद्र शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही नियंत्रित उद्योगाशी संबंधित असणारी कोणतीही आस्थापना, किंवा

(दोन) कोणतीही रेल्वे, कटक मंडळ, मोठे बंदर, खाण किंवा तेल-क्षेत्र यांची कोणतीही आस्थापना, किंवा

(तीन) बँकव्यवसायी किंवा विमाव्यवसायी कंपनीची कोणतीही आस्थापना,

यांच्या संबंधात केंद्र शासन असा अर्थ आहे,

(२) अन्य कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात, ज्या राज्यामध्ये ती अन्य आस्थापना आहे ते राज्य शासन असा अर्थ आहे ;

---

[१] १० फेब्रुवारी १९७१, पहा, जी. एस. आर. १९०, दिनांक १ फेब्रुवारी १९७१, गॅझेट ऑफ इंडिया असाधारण–भाग दोन–उपविभाग ३ (एक), पृ. १७३.